# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सातारा

जिल्हा आरोग्य अधिकारी
दुरध्वनी क्रमांक:- ०२१६२-२३३०२५
पत्ता:- खोली क्र ८ पहीला मजला,
जिल्हा परिषद, सातारा.
Email id - dpm.satara@gmail.com

जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
दुरध्वनी क्रमांक:- ०२१६२-२३५९४८
पत्ता:- खोली क्र १०२ तळमजला,
जिल्हा परिषद, सातारा.
Email id - dpm1.satara@gmail.com

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सातारा.


Outward No : NHM/ योग प्रशिक्षक कंत्राटी नियुक्ती आदेश/549/2024 Date : 11/10/2024

*"नियुक्तीपत्र"*

प्रति,
खालील संबंधित सर्व उमेदवार

संदर्भ - मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,सातारा यांची मंजुर टिपणी दि.१०/१०/२०२४

सदर पत्राद्वारे आपणांस कळविणेत येते की, आपली नियुक्ती योग प्रशिक्षक म्हणुन **खालीलप्रमाणे नमुद आयुष्मान आरोग्य मंदीर आयुष संस्थांमध्ये** निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेत येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | आरोग्य संस्थेचे नाव |
|---|---|---|
| १ | सुचित्रा गणपतराव शिंदे | आयुष्मान आरोग्य मंदीर आयुष आदर्की बु. ता. फलटण |
| २ | मनिषा महेश कदम | आयुष्मान आरोग्य मंदीर आयुष चोरे ता. कराड |
| ३ | मनीषा दत्तात्रय क्षीरसागर | आयुष्मान आरोग्य मंदीर आयुष भाडळे ता. कोरेगाव |
| ४ | चंद्रकांत कृष्णा माने | आयुष्मान आरोग्य मंदीर आयुष गुणवरे ता. फलटण |
| ५ | राजकुमार दगडू तुपे | आयुष्मान आरोग्य मंदीर आयुष इंजबाव ता. माण |

वरीलप्रमाणे आपली निवड ही तात्पुरती असलेने आपणांस खालील अटी व शर्ती लागु राहतील.

- आपली नियुक्ती दि. १४-१०-२०२४ ते दि. ३१-०३-२०२५ या कालावधीकरीता राष्ट्रीय आयुष मिशनच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२४-२५ च्या मंजुरीच्या अधीन राहुन देणेत येत आहे. केंद्र शासनाने सन २०२५-२६ करीता कोणत्याही पदास मान्यता दिली नाही तर अथवा भविष्यात इतर कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उदभवल्यास सदर पदावरील आपली नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना वा कोणतेही कारण न देता तात्काळ संपुष्टात आणली जाईल.
- अभियान अंतर्गत विविध आरोग्य संस्थांस्तरावर भरती करणेत येत असलेल्या योग प्रशिक्षकांना नियुक्ती आदेशात नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करणेत येत असुन ही नियुक्ती राष्ट्रीय आयुष अभियान प्रकल्प संपुष्टात येईपर्यंत किंवा करारपत्र कालावधी संपुष्टात येईपर्यंत राहील.
- योगप्रशिक्षक यांना योग सत्र घेणेसाठी अधिकतम रु.८०००/- प्रती माह मानधन देय असुन त्यांनी रु.२५०/- प्रती तास याप्रमाणे कमीत कमी ३२ तास/प्रती माह योग सत्र आयोजित करावयाचे आहेत.
- ३२ योग सत्रापैकी २० योगसत्रे आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये व उर्वरीत १२ योगसत्रे कार्यक्षेत्रामध्ये (शाळा, आश्रमशाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत, महिला बचत गट, जेष्ठ नागरीक संघ व इतर

Scanned by CamScanner

शासकीय/निमशासकीय संस्था) येथे घेण्यात यावीत. यापेक्षा अतिरिक्त योग सत्रे आयोजित केलेस अतिरिक्त मानधन अनुज्ञेय नाही.

- ३२ योगसत्रांपैकी कार्यक्षेत्रामध्ये कमीत कमी १ तासाचे २ आईसी उपक्रम राबविण्यात यावेत व आशा, आरोग्यसेविका, आरोग्य सेवक व इतर कर्मचारी यांचे योगविषयक प्रशिक्षण घेऊन क्षमता वृध्दी करण्यात यावी.
- राज्य स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित होणारे मार्गदर्शक सुचना/अटी आपणांस लागु राहतील.
- वैद्यकिय अधिकारी आयुष्मान आरोग्य मंदीर आयुष यांचेबरोबर शिबिराचे नियोजन करणेत यावे. सदर वैद्यकिय अधिकारी पद रिक्त असलेस आयुर्वेद दवाखाना ज्या प्रा.आ.केंद्राच्या कार्यक्षेत्रात येतो त्या वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली योगसत्रांचे नियोजन करावे.
- सदर पदाची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात असलेने भविष्यात नियमित कर्मचारी नियुक्ती म्हणुन आपणांस अधिकारी राहणार नाहीत.
- आपणांस नियुक्ती आदेश प्राप्त झालेपासुन ५ दिवसांच्या आत संबंधित आरोग्य संस्थेमध्ये रुजु व्हावे अन्यथा आपणांस रुजु होण्याची इच्छा नाही असे समजुन आपली नियुक्ती रद्द करणेत येईल.
- योग प्रशिक्षकाला **एक शिबीर किमान २० लाभार्थ्यांच्या उपस्थितीत** आयोजित करावयाचे आहे.
- दरमहा अहवाल सादर करताना पुढील बाबी आवश्यक आहेत. १) लाभार्थ्यांची सत्रनिहाय स्वाक्षरीसहीत हजेरीपत्रक २) वैद्यकिय अधिकारी आयुर्वेद दवाखाना यांच्या उपस्थितीत १ अथवा २ फोटो प्रति माह ३) वैद्यकिय अधिकारी आयुर्वेद दवाखाना यांची हजेरीपत्रकावर दिनांकासह स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.
- ज्या योगशिक्षकांचे वार्षिक मानधन रु.३००००/- पेक्षा जास्त होणार आहे अशा सर्व योगशिक्षकांचे राज्य कार्यालयाच्या पत्रानुसार कलम **Tax Compliance Calender मधील Section 194-J अंतर्गत आपल्या सेवा येत असल्याने 10 % TDS कपात करण्यात येईल.**

10/10/24

(डॉ. महेश खलिपे)
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा

प्रत माहितीसाठी

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा
२. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती.............सर्व
३. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र............................सर्व

Scanned by CamScanner